# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २२० वा शनिवार दि.०३ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज्य मागासवर्गीय आयोगाच्या रिपोर्टला कोर्टात चॅलेंज करू

पुणे : राज्य मागासवर्गीय आयोगाचा अहवाल हा शैक्षणिक आणि संशोधनात्मक असायला हवा होता. आताच्या राज्य मागासवर्गीय आयोगाचा सर्व्हे हा सुमार दर्जाचा आहे. कारण त्यांची प्रश्नावली आहे त्याचे उत्तर आर्थिक बेसवर केला जात आहे. हा सर्व्हे मराठा समाजाची उत्तरपत्रिका द्यायची असा खोटा सर्व्हे आहे. याला कोर्टात चॅलेंज करू असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

लक्ष्मण हाके यांनी सांगितले की, खोटी माहिती भरून सर्व्हे केले जात आहे. खोटी माहिती कुणी दिली तर त्यांच्यावर कारवाईचे कुठलेही अधिकार राज्य मागासवर्गीय आयोगाला नाही. मग ही खोटी माहिती भरून एकाबाजूला प्रश्नपत्रिका आणि एका बाजूला उत्तरपत्रिका देतायेत. मग ९५, ९९ मार्क्स पडतील. मग त्यामुळे मूळ सामाजिक मागासलेल्या लोकांवर तुम्ही अन्याय करणार नाही का? राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अहवालाला आम्ही कोर्टात चॅलेंज करू. ही माहिती संशोधनात्मक नाही. ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा आरक्षण देणार होते. मग या अधिसूचनेनंतर मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि सर्व पक्षांच्या प्रमुखांनी कशारितीने ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही हे समजवावे. या प्रकरणात सर्वपक्षीय बैठक बोलवावी आणि वातावरण बिघडणार याची काळजी घ्यावी असे त्यांनी सांगितले.

तसेच राज्य सरकारने जी अधिसूचना काढली त्यानंतर मी सोशल मीडियावर ओबीसी, विजे-एनटी, भटक्या विमुक्त जाती यांच्या हक्कासाठी प्रत्युत्तर दिले. संविधानिक आणि कार्यकर्ता म्हणून जे अनुभव आहेत ते मांडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर शेकडो कॉल तुला बघून घेऊ, तू संभाजीनगरला ये, बीडला ये अशा धमक्यांचे आलेले आहेत. मी त्याविषयी पुणे आयुक्तांकडे तक्रार देत आहे. आम्ही संविधानिक न्यायहक्कांची भाषा करत असू तर समोरुनही तसे विचार यावेत. वैचारिक चर्चा होणे अपेक्षित आहे. हा महाराष्ट्र म्हणजे बिहार नव्हे. फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. इथे आचार, विचार करावा लागतो. आता जी आंदोलन उभी राहतायेत, त्यांच्या नेतूत्वाने पुढे आले पाहिजे. त्या नेतृत्वाने काही गोष्टी बोलताना संविधानिक आणि राज्यातील सर्व समाजाला डोळ्यासमोर ठेऊन केली पाहिजे. मी बघून घेईन, मी छाताडावर नाचेन अशी विधाने एवढ्या मोठ्या समाजाचे नेतृत्व करताना आली तर निश्चित त्यावर क्रिया प्रतिक्रिया उमटणार आहेत. आम्ही संविधानिक, कायद्याबद्दल बोललो तर इतके झोंबण्याचे कारण काय? असा सवालही लक्ष्मण हाकेंनी धमकी देणा-यांना विचारला आहे.

## दारूबंदीसाठी तत्तापूरच्या महिला झाल्या आक्रमक

रेणापूर : प्रतिनिधी-तालुक्यातील तत्तापूर येथे राजरोसपणे विक्री होत असलेल्या देशी विदेशी गावठी दारू तात्काळ बंद करावी अन्यथा दि .१० फेब्रुवारी रोजी पोलीस दुरुक्षेत्राच्यासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासह, रेणापूरच्या तहसिलदार ' पोलीस ठाण्याकडे तत्तापूर येथील महिलांनी दि .१ फेब्रुवारी रोजी दिले आहे.तालुक्यातील तत्तापूर येथे सहा ते सात घरांमध्ये देशी विदेशी हातभट्टी दारु राजरोसपणे विक्री केली जाते. यामुळे अनेकांचे संसार उद्धस्त झाले आहेत . दारुसाठी पुरुष घरातील संसारोपयोगी वस्तू विकत असल्यामुळे दररोज घरात भांडणे होत आहेत. महिलांवर मानसिक अत्याचार करीत आहेत. दाऊ पिऊन होणा-या छळास कंटाळून महीला आत्महत्या करण्याच्या मानसिकतेत आहेत.याचा परीणाम लहान बालकाच्या बाल मनावर होत आहे.

## ३१ मार्चपूर्वी सर्व ऊसाचे गाळप करा



लातूर : प्रतिनिधी शेतकरी सभासदांच्या जिवनात आपल्या कार्यातून अमुलाग्र आर्थकि बदल घडवून आणत असलेल्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अलाईड इंडस्ट्रीजने २०२३-२०२४ मध्ये विद्यमान गळीत हंगामात केवळ ८८ दिवसात ४ लाख ९ हजार मे. टनाचे ऊसाचे गाळप करुन सक्षम नियोजनाचा एक आदर्श घालून दिला असून विद्यमान गळीत हंगाम मार्च ३१ पूर्वी ऊसाचे गाळप व्हावे, अशा सूचना जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी कारखाना प्रशासनास दिल्या आहेत जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनानुसार २० जानेवारी २०२३ अखेर कारखान्याकडे गाळपास आलेल्या ऊसाला ऊसबिला पोटी प्रति मेट्रीक टन २५०० रुपये याप्रमाणे पहिला हप्ता दिला असुन यासोबत ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांचे पेमेंट ठरलेल्या कालावधीत नियमीतपणे अदा केले जात आहेत. जागृती साखर कारखान्याने विद्यमान गळीत हंगामात ८ लाख ३६ हजार १०० (५० कि.) इतके पोते साखर उत्पादन केले आहे. ३५ लाख ३३ हजार ४५३ लिटर इतके इथेनॉल निर्मिती केली आहे. तसेच १ कोटी ३८ लाख ३७ हजार युनिट इतकी वीज वितरीत केली आहे. दि. ३१ जानेवारी २०२४ अखेर सरासरी ११.०१ एवढा साखर उतारा जागृती कारखान्यास प्राप्त झाला आहे. विद्यमान गळीत हंगामात शेतकरी सभासदांचे ऊसाचे गाळप तत्परतेने व्हावे या हेतूने प्रति दिन २५०० एवढी गाळप क्षमतेवरुन ५००० मे.टन दैनंदिन गाळप क्षमता साखर कारखान्याने केली आहे. त्यामुळे या भागातील अतिरीक्त ऊस जागृती साखर कारखाना मार्चपर्यंत सुरु ठेवणार असून गाळपाचे नियोजन कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुखह्याांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे असून जागृती शुगरने नेहमीच बदलत्या आधुनिक परिस्थितीत काळाची गरज ओळखुन पावले उचलली आहेत. उपपदार्थ निर्मितीतून अधिकचा ऊसदर शेतक-यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

## भाजपचे आता ‘गाव चलो’ अभियान




मुंबई : यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे वर्ष आहे. आधी लोकसभा आणि नंतर विधानसभेची निवडणूक लागण्याबाबत सर्वत्र चर्चा सुरु आहे. तशातच आज भाजपाकडून एका नव्या अभियानाची घोषणा करण्यात आली. हे अभियान नक्की काय आणि त्यातून नक्की काय केले जाणार आहे, याबद्दल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली.भाजपतर्फे ४ ते ११ फेब्रुवारी या काळात व्यापक जनसंपर्कासाठी गाव चलो अभियान राबविण्यात येणार आहे. भाजपा मुंबई कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बावनकुळेंनी ही माहिती दिली. या अभियानात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व मंत्री, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्यासह पक्षाचे सर्व केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार आहेत असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. आपण स्वत: अमरावती जिल्ह्यातील साऊर येथे एक दिवस राहणार आहोत असेही त्यांनी नमूद केले.ते म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तम संघटनात्मक बांधणी करत, विकासाचा अजेंडा डोळ्यासमोर ठेवून भाजपा कार्य करत आहे. तळागाळातील प्रत्येक मतदारापर्यंत मोदी सरकारचे मागच्या १० वर्षातील प्रभावी कार्य, मागच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणा-या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती पोहोचण्याच्या उद्देशाने ‘गाव चलो अभियान’ हाती घेण्यात आले आहे. मोदीजीं ची गॅरंटी काय आहे हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी मागच्या १० वर्षातील मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रके वितरित करण्यात यूेणार आहेत.कोणत्या नेत्याला कोणते गाव? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्यातील पारडिंसगा येथे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा ( ता. कळमेश्वर ) मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार हे गुरामवाडी (ता. मालवण), रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे हे जालना जिल्ह्यातील वालसावंगी येथे एक दिवस मुक्कामास जाणार आहेत. पीयूष गोयल, डॉ. भारती पवार, डॉ. भागवत कराड, कपिल पाटील हे केंद्रीय मंत्रीही या अभियानात सहभागी होणार आहेत. शहरी भागात वॉर्ड निहाय हे अभियान राबविले जाईल. केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे विलेपार्ले येथे या अभियानात सहभागी होणार आहेत.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा



लातूर, दि. २ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शनिवार, ३ फेब्रुवारी २०२४ लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ना. बनसोडे हे ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. सकाळी १० वाजता उदगीर बी. आर. सी. येथे पत्रकार भवन कृती समिती नाम फलकाच्या अनावरण सोहळ्यास ते उपस्थित राहतील. सकाळी १०.३० वाजता उदगीर शहरातील पैगंबरपुरा येथे श्री. शफी हाशमी यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सकाळी ११ वाजता उदगीर तालुक्यातील शिरोळ जानापूर येथे श्री. कैलास प्रकाशराव पाटील यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. दुपारी १२ वाजता उदगीर तालुक्यातील कासराळ येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत होणाऱ्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधारा कामाचे भूमिपूजन सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी २ वाजता उदगीर तालुक्यातील सुमठाणा येथे श्री. बाळासाहेब माणिकराव पाटील यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे हे दुपारी ३ वाजता जळकोट तालुक्यातील मरसांगवी येथे शादावल साहेब उरूस उत्सवानिमित्त कुस्त्यांच्या कार्यक्रमास उपस्थित राहतील. सायंकाळी ६ वाजता उदगीर तालुका क्रीडा संकुल येथे श्री. बाळासाहेब पाटोदे युवा मित्र मंडळाच्यावतीने आयोजित नृत्य स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहतील व सोयीनुसार उदगीर येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण करतील.

# संपादकीय....

## स्थैर्याकडून सामर्थ्याकडे

सरकारने गेल्या दहा वर्षांत सावरलेली अर्थव्यवस्था आणि साधलेल्या प्रगतीचा आलेख अंतरिम अर्थसंकल्पाच्या निमित्ताने मांडला. त्याबरोबरच आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू असणारे चार महत्त्वाचे घटक विशद केले.'लेखानुदान' किंवा हंगामी अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला. सार्वत्रिक निवडणूक आता दोन महिन्यांत अपेक्षित आहे. सरकारच्या प्रासंगिक आर्थिक व्यवहारांमध्ये खंड पडू नये, यासाठी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला जातो.नवीन सरकार येईपर्यंत 'नाइट वॉचमन'चे काम करणे, एवढाच त्याचा उद्देश असतो. अशा हंगामी अर्थसंकल्पात मोठे धोरणात्मक किंवा आर्थिक कायद्यात व करप्रणालीत बदल करू नयेत, असा संकेत असतो. त्याचे तंतोतंत पालन अर्थमंत्र्यांनी केले. त्यामुळे त्यांचे भाषणही आटोपशीर होते.अर्थात, अर्थसंकल्प सादर करण्याच्या निमित्ताने सरकारच्या कामगिरीचा आढावा घेऊन त्याचे 'प्रगती पुस्तक' माध्यमे व नागरिकांपुढे ठेवता येते. पुढील काळात आपले सरकार सत्तेवर आले, तर आर्थिक प्रगतीची दिशा व धोरणे काय असतील, हे मांडण्याचीही ही एक संधी असते.निर्मला सीतारामन यांनी या दोन्ही उद्दिष्टांसाठी आजच्या व्यासपीठाचा सुयोग्य उपयोग केला. संपूर्ण अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक सर्वेक्षणाचा सविस्तर अहवालही सादर केला जातो. पण प्रस्तुतचा अर्थसंकल्प 'हंगामी' असल्यामुळे अशा सर्वेक्षणाऐवजी एक संक्षिप्त पुनरावलोकन सरकारच्या आर्थिक सल्लागारांनी ३१ जानेवारी रोजी सादर केले होते.सरकारच्या कामगिरीचे सिंहावलोकन सामान्यतः पाच वर्षांसाठी केले जाते. पण २०१४ पासून तेच सरकार असल्याने ही कक्षा दहा वर्षांसाठी यावेळी होती. २०१३ मध्ये आपल्याकडे परकी चलनाचा मोठा पेचप्रसंग उभा राहिला होता. चालू खात्यावरची तूट प्रमाणाबाहेर वाढली होती. डॉलरच्या तुलनेत रुपया ५४ वरून ६९ पर्यंत गडगडला होता.अतिशय नाजूक स्थिती असणाऱ्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये भारत गणला जात होता. भाववाढीचा दर दहा टक्क्यांवर गेला होता. रिझर्व्ह बँकेने व्याज दर ३.५० टक्के वाढविले, आणि सरकारी कंपन्यांनी करमुक्त कर्जरोखे अतिशय आकर्षक दराने बाजारात आणले. परदेशातून येणाऱ्या बँकठेवींना सरकारने संरक्षण दिले आणि ही आणीबाणीची परिस्थिती नियंत्रणात आणली गेली होती.त्या नाजूक परिस्थितीमधून प्रथम स्थैर्याकडे आणि नंतर सामर्थ्याकडे आपल्या अर्थव्यवस्थेचा प्रवास याच दहा वर्षांत झाला असल्यामुळेसुद्धा ही दहा वर्षांची कसोटी लावणे सयुक्तिक ठरते. आर्थिक सल्लागारांच्या अहवालात मुख्यतः याच विषयाचा उहापोह केलेला आहे.गेल्या दहा वर्षांत आपण अनेक स्थित्यंतरातून गेलो आहोत. नोटाबंदी, वस्तूसेवा कर (जीएसटी), बँकांमधील थकित बुडित कर्जाच्या समस्येचे निराकरण, कोविड-१९चे जागतिक महासंकट आणि रशिया-युक्रेन युद्धानंतर भडकलेले कच्च्या तेलाचे दर या सर्व संकटांचा सामना करीत आज आपण इंग्लंडला मागे टाकून जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालो आहोत.कोविडमध्ये जगातील सर्वच देशांच्या आर्थिक वाढीचा दर 'उणे' झाला होता. पण त्यानंतर सातत्याने तीन वर्षे आपण ७% दराने आर्थिक वाढ केली आहे. जगाच्या वाढीचा दर जेमतेम २% असताना सर्वाधिक वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था भारत ठरला आहे. आपली परकी चलनाची गंगाजळी ६०० अब्ज डॉलर आहे आणि भाववाढही सहा टक्क्यांपेक्षा कमी राखली गेली आहे.वित्तीय तूट मर्यादेत ठेवणे, हे विवेकी धोरणाचे उद्दिष्ट असते. आजच्या अर्थसंकल्पामध्ये, २०२३-२४ या वर्षासाठी वित्तीय तूट ५.८ टक्क्यांवर आल्याचे अर्थमंत्र्यांनी नमूद केले. गेल्यावर्षी अर्थसंकल्प मांडताना प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा हे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य श्रेय करसंकलनात आलेल्या उभारीला आहे. या वर्षी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे एकूण संकलन २३.२४ लाख कोटी इतके झाले. २०२४-२५ वर्षाच्या अंदाजात हे २६.०२ लाख कोटी इतके गृहित धरले आहे.म्हणजे सुमारे बारा टक्क्यांची वाढ प्रस्तावित आहे. ७% दराने आर्थिक वाढ झाल्यास हे लक्ष्य निश्चितच आवाक्यात आहे. त्यामुळे कर्जरोख्यांच्या माध्यमातून सरकार करीत असलेली कर्ज उभारणी मागील वर्षीपेक्षा कमी, म्हणजे ११.७५ लाख कोटी इतकीच निव्वळ रक्कम राहील. याचा लाभ कंपन्या आणि उपभोक्ता कर्जासाठी अधिक रक्कम उपलब्ध होण्यामुळे होईल. व्याजाचे दर कमी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.धोरणाचे केंद्रबिंदू आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू असणारे चार महत्त्वाचे घटक म्हणजे अन्नदाता शेतकरी, महिला, युवक आणि समाजातील गरीब वर्ग; आगामी सरकारी धोरण या चारही घटकांची क्षमता वाढविण्यासाठी कसे योजले जात आहे, हे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. जनधन खात्याद्वारे अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यात जाते. अशाप्रकारे ३४ लाख कोटी रुपये वितरित करण्यात आले.त्यात 'गळती' नसल्याने सरकारची २.७ लाख कोटींची बचत झाली. किसान सन्मान योजनेचा लाभ ११.८ कोटी शेतकऱ्यांना पोचला, तर पीक विमा योजनेमुळे चार कोटी शेतकऱ्यांना कवच मिळाले. एक हजार ३६१ मंडया इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जोडल्या जाऊन त्यातून तीन लाख कोटींची उलाढाल झाली.तर्कशुद्ध प्रयत्न स्त्रीशक्तीचा अर्थमंत्र्यांनी विशेषतेने उल्लेख केला. मुद्रा योजनेअंतर्गत ४३ कोटी नागरिकांना वित्त पुरवठा झाला. त्यातील ३० कोटी महिला आहेत. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण २८टक्क्यांनी वाढले. आवास योजनेसाठी गृहकर्जांमध्ये ७० टक्के घरे स्त्रियांच्या नावाची आहेत. देशाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी स्त्री वर्गाचा रोजगारामधील सहभाग वाढणे आवश्यक आहे.हे प्रमाण २३ टक्क्यांवरून ३७ टक्क्यांवर गेले, पण यात अजून भरघोस प्रगती होणे जरूरीचे आहे. निवडणुकांमध्ये एक तृतीयांश जागा स्त्रियांसाठी राखीव करण्याचा कायदा संमत झाला. याचाही त्यांनी विशेष करून उल्लेख केला. बचत गटांना दिलेल्या योजनांमधून एक कोटी महिला 'लखपती दीदी' झाल्या आहेत. याचे उद्दिष्ट दोन कोटींवरून तीन कोटींवर वाढविले आहे.रेल्वे, रस्ते, बंदरे, विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधांवरील खर्च ११% वाढवून ११ लाख कोटी, तेलबिया उत्पादनांमध्ये आत्मनिर्भरता, सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेसाठी तरतूद, कौशल्य विकास, उच्च तांत्रिक शिक्षणासाठी प्रोत्साहन, स्टार्ट अपसाठी क्रेडिट गॅरंटी, बिनव्याजी कर्जाचा एक लाख कोटींचा निधी, 'इनोव्हेशन' वाढविण्यासाठी बायोफ्युएल, बायोगॅस, हरित ऊर्जा यांना उत्तेजन अशा अनेक योजनांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला.हा अंतरिम अर्थसंकल्प असल्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे दर व तरतुदी 'जैसे थे' ठेवल्या आहेत. काही सवलतींची मुदत मार्च २०२४ रोजी संपणार होती, ती एक वर्षाने वाढविली आहे. हंगामी अर्थसंकल्पाच्या मर्यादा संभाळून धोरणे अधोरेखित करण्याचा अर्थमंत्र्यांचा आजचा प्रयत्न तर्कशुद्ध आहे.

# धावांची बरसात होईल?

क्रिकेटच्या इतिहासात आजवर असंख्य बदल होत गेले आणि त्यातून या सामन्याला एका बाजूने शिस्तीचे कोंदण देतानाच दुस-या बाजूला त्यातील रंजकता, उत्कंठा, रोमहर्षकपणा कसा वाढत जाईल याचा विचार केला गेला. टी-२०ची भन्नाट संकल्पना अवतरल्यानंतर क्रिकेटमधील रंजकता आणि उत्कंठा शिगेला पोहोचतानाच लोकप्रियतेनेही कळस गाठला. दरम्यानच्या काळात पॉवर प्ले, फ्री हिट यांसारख्या नियम आणि अभिनव प्रयोगांनीही क्रिकेट प्रेक्षकांना अधिकाधिक आनंद कसा मिळेल याची तजवीज केली. अशाच प्रकारचे काही बदल आता होऊ घातले असून त्याबाबत आयसीसीकडे प्रस्तावही दिला गेल्याचे समजते. त्यातील एक प्रस्ताव म्हणजे १०० मीटरपेक्षा अधिक उंचीवरून षटकार लगावल्यास त्याबदल्यात सहाऐवजी १२ धावा दिल्या जाणार आहेत. केविन पीटरसनने केलेल्या या मागणीला अनेक दिग्गज क्रिकेटपटूंनी अनुकूलता दर्शवली आहे. या प्रस्तावाला संमती मिळाल्यास क्रिकेटच्या मैदानावर धावांची आतषबाजी होताना दिसणार आहे.टलमन्स गेम' म्हणून ओळखल्या जाणा-या क्रिकेटला प्रदीर्घ इतिहास लाभला आहे. फ्रेंच भाषेतील क्रॉक्युट या शब्दापासून क्रिकेट या शब्दाची उत्पत्ती झाली असे सांगितले जाते. शंभराहून अधिक वर्षांपूर्वी दक्षिण पूर्व इंग्लंडमधील वेल्ड येथे राहणा-या मुलांकडून हा खेळ खेळला जात होता. १६११ मध्ये त्याला खेळप्रकार म्हणून प्रमाणित करण्यात आले. १७४४ हे वर्ष क्रिकेटच्या या इतिहासात महत्त्वाचे मानले जाते. कारण यावर्षी प्रथमच या क्रीडाप्रकाराला नियमांचे कोंदण लाभले. अठराव्या शतकापासून क्रिकेट हा ब्रिटनचा प्रमुख खेळ बनला. १८४४ मध्ये सर्वांत पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना अमेरिका आणि कॅनडा यांच्यादरम्यान खेळला गेला. पुढे १८९० मध्ये पहिल्यांदा काऊंटी क्रिकेट चॅम्पियनशिपची औपचारिकरीत्या स्थापना करण्यात आली. १८८९ मध्ये एका षटकामध्ये चार चेंडूऐवजी पाच चेंडू असतील, असा बदल करण्यात आला. १९०० सालापासून सहा चेंडूंचे एक षटक बनले. भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या आगमनानंतर क्रिकेटची मुहूर्तमेढ रोवली गेली. २५ जून १९३२ रोजी भारताच्या क्रिकेट संघाने इंग्लंडमधील लॉर्डस्च्या मैदानावर आपला पहिला कसोटी सामना खेळला; तर १३ जुलै १९७४ रोजी लीडस्मध्ये इंग्लंडविरोधात भारतीय संघ पहिल्यांदा एकदिवसीय सामना खेळला. स्वातंत्र्यानंतर क्रिकेटविषयीची लोकप्रियता झपाट्याने वाढत गेली आणि भारतीय उपखंडातील सर्वाधिक क्रिकेटप्रेमींचा देश म्हणून आपण 'नावलौकिक' मिळवला.क्रिकेटच्या विश्वात कसोटी सामन्यांना खूप मोठा प्रेक्षकवर्ग होता. सलग पाच दिवस संपूर्ण सामना पाहणारे लाखो भारतीय आजही आहेत. तथापि, पूर्वीच्या तुलनेत ही संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. याचे कारण ज्याप्रकारे जीवनशैलीला वेग येत गेला तसतसे क्रिकेटमध्येही बदल होत गेले. ५० षटकांच्या एकदिवसीय सामन्यांकडे क्रिकेटरसिकांचा ओढा वाढू लागला; परंतु टी-२०च्या उदयानंतर क्रिकेटचे सर्व आयामच बदलून गेले. भारताचा विचार करता ललित मोदी यांनी आयपीएलच्या माध्यमातून क्रिकेटविश्वात केवळ अर्थकारणाचा प्रवाहच खुळखुळता केला नाही तर क्रिकेटरसिकांची अभिरुचीच बदलून टाकली. क्रिकेटच्या इतिहासात सर्वांत महत्त्वपूर्ण घटनांपैकी आयपीएल ही एक स्पर्धा आहे. टी-२० क्रिकेट आयपीएलच्या आधी सुरू झाले. पण, आयपीएलमुळे टी-२० ला खरे महत्त्व प्राप्त झाले. आज बहुतेक सर्व देशांतील क्रिकेट प्रशंसक आयपीएल सामने कधी आहेत हे लक्षात घेऊन आपल्या कॅलेंडरनुसार कार्यक्रमांच्या नोंदी ठरवतात, अशी स्थिती आहे.२० षटकांच्या सामन्यांमुळे क्रिकेटमधील रंजकता, उत्कंठा शिगेला पोहोचू लागली. परिणामी याचे रंजक मूल्यही वाढत गेले. धावांचे डोंगर उभे राहू लागले. पूर्वी एकदिवसीय सामन्यातील ५० षटकांमध्ये २५० ची धावसंख्या खूप मोठी वाटायची; पण आता अवघ्या २० षटकांमध्ये ४०० धावांचा मेरूपर्वत लीलया उभे करणारे फलंदाज आणि संघ अस्तित्वात आले. पॉवर प्ले, फ्री हिट यांसारख्या संकल्पनांमुळे क्रिकेटमधील रंजकता आणखी वाढत गेली.साधारणत: १९७५ ते १९८४ या काळात कसोटी तसेच एकदिवसीय मालिका यांचे प्रमाण अत्यंत मर्यादित होते. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात एकदिवसीय क्रिकेटचे फॅड जगभर वाढत गेले. आज टी-२० सामन्यांमुळे कसोटी सामने हवेत कशाला असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याचे कारण क्रिकेटरसिकांना आता थ्रील, टोकाची उत्कंठा, जबरदस्त चुरस या सर्वांची सवय लागली आहे. तशातच आता क्रिकेटमध्ये सुचवण्यात आलेल्या नव्या प्रस्तावाला संमती मिळाल्यास क्रिकेटरसिकांसाठी ती पर्वणी ठरणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला अलीकडेच काही नव्या बदलांसंदर्भात शिफारसी करणारे प्रस्ताव देण्यात आले आहेत. यापैकी एक प्रस्ताव अतिशय भन्नाट आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसन याने सुचवलेल्या या प्रस्तावानुसार क्रिकेट सामन्यामध्ये एखाद्या फलंदाजाने १०० मीटरहून अधिक लांब षटकार ठोकल्यास त्याला कमीत कमी १२ धावा दिल्या जाव्यात. पीटरसनने जाहीरपणाने ही बाब यापूर्वीही काही वेळा मांडली होती. भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मासह अनेक दिग्गज क्रिकेटपटू पीटरसनच्या या मताशी सहमत आहेत. वास्तविक पाहता, बेजबॉलच्या युगामध्ये १०० मीटर लांब षटकार हा काहीसा दुर्मिळ झाला आहे.टी-२० सामन्यांमध्येच असा उत्तुंग षटकार पाहायला मिळतो. आपल्याकडे छोट्याशा गल्ल्यांमध्ये लहानपणी क्रिकेट खेळणा-यांना आठवत असेल की, एका विशिष्ट अंतरापलीकडे चेंडू गेल्यास सहापेक्षा अधिक रन मिळतील असा गमतीशीर नियम ठरवला जायचा. कारण इतक्या लांबपर्यंत चेंडू जाणारच नाही अशी शक्यता त्यामागे असायची. पण एखादा मोठ्या वयोगटातील, अंगकाठी मजबूत असणारा, कसलेला फलंदाज आला की तो या शक्यता मोडीत काढायचा. तशाच प्रकारे क्रिकेटच्या मैदानातही अनेक महारथींनी स्टेडियमबाहेर चेंडू फटकावल्याची उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष मैदानात किंवा टीव्हीच्या पडद्यावर असा षटकार पाहताना प्रेक्षकांचे तुफान मनोरंजन होते. अर्थातच असा उत्तुंग षटकार ठोकण्यामागे प्रचंड कौशल्य, अचूकता आणि ताकदीबरोबरच तंत्रही फलंदाजाला अवगत असणे गरजेचे असते. बरेचदा असा प्रयत्न अयशस्वी ठरून फलंदाज बाद झाल्याचेही दिसले आहे. पण तरीही आपल्या संघासाठी आणि चाहत्यांसाठी फलंदाज असे साहस करतात. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात आजवरचा सर्वांत लांबवरचा षटकार ठोकण्याचा विक्रम पाकिस्तानचा माजी फलंदाज शाहीद आफ्रिदीच्या नावावर नोंदवला गेलेला आहे.२०१३ मध्ये जोहान्सबर्ग येथे खेळल्या गेलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात आफ्रिदीने १५८ मीटर लांब षटकार ठोकला होता. त्याखालोखाल ब्रेट ली (१३० मीटर), मार्टिन गुपटिल १२७ मीटर, लियाम लिव्हिंगस्टोन १२२ मीटर, कॉरी अँडरसन १२२ मीटर, मार्क वॉ १२० मीटर, युवराज सिंग ११९ मीटर आणि महेंद्रसिंग धोनी ११८ मीटर अशी क्रमवारी आहे. इतक्या अथक प्रयत्नांनी दूरवर लांब षटकार ठोकूनही फलंदाजाच्या आणि संघाच्या खात्यात फक्त सहाच धावा मिळतात, ही बाब योग्य नाही असा काहीसा विचार १२ धावांची मागणी करणा-यांच्या मनात असावा. तो चुकीचा म्हणता येणार नाही. पण यामध्ये एक पेच आहे. तो म्हणजे अशा प्रकारच्या षटकारांचे अचूक मोजमाप करण्याचे तंत्रज्ञान आज उपलब्ध असले तरी ते परिपूर्ण नसल्याचे काहींचे म्हणणे आहे. गोल्फ खेळामध्ये ते उपलब्ध आहे. दुसरीकडे, काहींच्या मते सध्याचे तंत्रज्ञान अचूकपणाने हे अंतर मोजू शकते. याचा वापर करून नवा प्रस्ताव स्वीकारण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली आहे. काही खेळाडूंच्या मते सहा धावांवरून एकदम १२ धावांवर उडी घेणे थोडे अतिशयोक्तीचे ठरेल. त्याऐवजी अशा उत्तुंग षटकाराप्रीत्यर्थ ८ धावा देणे योग्य ठरतील. रोहित शर्माच्या मते, ८० मीटर अंतरावरील फटक्यासाठी ६ धावा आणि १०० मीटरहून अधिक फटक्यासाठीही तितक्याच धावा हा फलंदाजांवर अन्याय आहे.काही काळापूर्वी समालोचकांच्या पातळीवर असणारी चर्चा आता आयसीसीकडे प्रस्ताव म्हणून सादर करण्यात आली असून लवकरच तिला मान्यता मिळू शकते. तसे झाल्यास क्रिकेटच्या मैदानावर उत्तुंग षटकारांचा वर्षाव होताना रसिकांना पाहायला मिळू शकतो. सद्यस्थितीत १०० मीटर किंवा त्याहून अधिक लांबीचे षटकार फारसे दिसत नाहीत. दोन महिने चालणा-या आयपीएल स्पर्धांमध्ये १०० मीटरहून अधिक लांबीचे जेमतेम १० षटकार पाहायला मिळतात. पण १२ धावा देण्याचा निर्णय प्रत्यक्षात आला तर फलंदाजांमध्ये यासाठीची अहमहमिका लागल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. दुसरीकडे गोलंदाजांसाठी मात्र ही बाब चिंता वाढवणारी ठरेल. कारण यामुळे प्रतिस्पर्धी संघाला मोठी धावसंख्या उभी करणे सहजशक्य होणार आहे. पण यॉर्कर, रिव्हर्स स्विंग यांसारख्या तंत्रांचा वापर करून अशा प्रकारचा प्रयत्न करणा-या फलंदाजांच्या यष्टी उडवण्याचे कसब असल्यास गोलंदाजांना घाबरण्याचे कारण नाही ! एकंदरीत हा निर्णय क्रिकेटमधील घमाशान वाढवणारा ठरेल यात शंका नाही! पाहूया..



# जादू आकडे फुगवण्याची

भारतातल्या तंत्रज्ञानाचा वेग जसजसा वाढायला लागला तसतसं घोटाळ्यांचं-गैरव्यवहारांचं स्वरूपही बदलू लागलं आणि आता तर यत्र-तत्र-सर्वत्र आर्थिक घोटाळे दिसायला लागले आहेत. केवळ सूचिबद्ध कंपन्यांची मक्तेदारी न राहता आर्थिक घोटाळे आता सर्वच व्यवसायात दिसतात, वित्तपत्रकात घोटाळे करण्याच्या पद्धतीपण साधारणतः सारख्याच असतात, बदलतात ते फक्त घोटाळे करायचे उद्देश.भारतातल्या सर्व व्यवसायांचं 'आर्थिक घोटाळे' या सदराखाली वर्गीकरण करायचं म्हटलं तर ते तीन प्रकारात होतं. पहिला प्रकार : सूचिबद्ध कंपन्या, दुसरा प्रकार : खासगी व्यवसाय...यात खासगी कंपन्या, भागीदारी कंपनी, दुकानं इत्यादी. तिसरा प्रकार : स्टार्टअप्स. ज्याप्रमाणे शाळेत विद्यार्थ्यांना प्रगतिपुस्तक सही करून न्यावं लागतं, त्याचप्रमाणे सूचिबद्ध कंपन्यांनादेखील दर तिमाहीत 'प्रगतिपुस्तक' सही करून आणावं लागतं. त्या व्यावसायिक प्रगतीविषयी मग अनेक लोक त्यांचं अवलोकन बाजाराला, गुंतवणूकदारांना सादर करतात.या विश्लेषणावर भविष्यातल्या बाजारभावाचा काथ्याकूट होतो. गेल्या तिमाहीपेक्षा या तिमाहीत आणि या तिमाहीपेक्षा पुढच्या तिमाहीत वाढीव आकडे दिसलेच पाहिजेत असा भांडवलबाजाराचा अलिखित दंडकच बनून गेला आहे.मात्र, दर वेळी या अपेक्षा पूर्ण केल्या जाणं शक्य होत नाही; कारण, व्यवसाय करताना अनेक अडचणी येत असतात...लोक सोडून जात असतात...तंत्रज्ञान बदलत असतं...नवनवीन स्पर्धक बाजारात उतरत असतात... सरकारं बदलत असतात.आणि, अशा सर्व परिस्थितीत सूचिबद्ध कंपन्यांना वाढलेली विक्री, वाढलेला नफा हा दाखवावाच लागतो; नाहीतर मग भांडवलबाजार निष्ठूर होऊन त्यांना 'शिक्षा' देतो. प्रगतिपुस्तकातले आकडे अपेक्षेनुसार नसले की गुंतवणूकदार लगेच समभागांची विक्री करायला लागतात. विक्री वाढली की साहजिकच समभागांच्या किमती खाली पडायला लागतात. आणि, पडत्या किमती कोणत्या मालकाला आवडतील?

एका बाजूला वाढणारी आव्हानं, तर दुसऱ्या बाजूला भांडवलबाजाराचा बदलणारा दृष्टिकोन अशा कोंडीत या सूचिबद्ध कंपन्या अडकायला लागतात. आणि, मग सुरू होतो तो वित्तपत्रकात फेरफार करण्याचा खेळ!सन २००८ च्या सप्टेंबर महिन्यात 'इंडियाफोरेन्सिक' या संस्थेद्वारे प्रकाशित झालेल्या संशोधन-अहवालात बाराशे सूचिबद्ध कंपन्या ताळेबंदात काहीतरी गोलमाल करत असल्याची माहिती सर्वप्रथम जगासमोर आली होती.या अहवालाला जेमतेम सहा महिने उलटत नाहीत तोच २००९ च्या जानेवारी महिन्यात 'सत्यम'चा घोटाळा उघडकीला आला. या घोटाळ्यानंतर प्रवर्तक कशा पद्धतीनं वित्तपत्रकांचे खेळ करतात हे पहिल्यांदा जाहीरपणे जगासमोर आलं.भांडवलबाजाराच्या अपेक्षा सूचिबद्ध कंपन्यांना काय काय करायला भाग पाडू शकतात याची प्रचीती व्यवसायांना आली. विक्रीचे आकडे फुगवण्यापासून ते पार बँकेचे खातेउतारेच खोटे छापण्यापर्यंतच्या सगळ्या गोष्टी गुंतवणूकदारांना खूश ठेवण्यासाठी 'सत्यम'च्या व्यवस्थापनानं केल्या. 'सत्यम'च्या घटनेनंतरही अनेक कंपन्या वित्तपत्रकांत फेरफार करण्याचा वारसा पुढं चालवताना दिसतात. घोटाळे करायच्या पद्धतींना नावं काहीही द्या; पण शेवटी सगळ्या सूचिबद्ध कंपन्यांचा उद्देश हा भांडवलबाजारातल्या त्यांच्या व्यवहारांशीच जोडला गेलेला असतो.याउलट, दुसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या खासगी कंपन्यांचे उद्देश बहुविध असतात. सूचिबद्ध कंपन्यांना त्यांची विक्री वाढीव दाखवायला आवडते, तर खासगी कंपन्यांचा उद्देश सहसा कमीत कमी करभरणा करण्याचा असतो. कराचे दोन प्रकार असतात.प्राप्तिकर आणि अप्रत्यक्ष कर. खासगी कंपन्यांना हे दोन्ही कर हा नेहमीच बोजा वाटत असतो. प्राप्तिकर चुकवायला मग खर्च वाढवले जातात, रोखीचे व्यवहार केले जातात, मिळालेलं उत्पन्न लपवलं जातं.अप्रत्यक्ष कर म्हणजे - पूर्वीचा 'व्हॅट' किंवा आताचा 'जीएसटी' - चुकवायला खोटी बिलं घेतली जातात, बोगस कंपन्या तयार केल्या जातात किंवा अनेक क्लृप्त्या लढवल्या जातात. 'इंडियाफोरेन्सिक' या संस्थेद्वारे या विषयावर 'सर्टिफाईड फोरेन्सिक अकाउंन्टिंग प्रोफेशनल' नावाचा एक तपशीलवार शैक्षणिक कार्यक्रम चालवला जातो.या कार्यक्रमात खासगी संस्थांच्या घोटाळ्यांच्या विविध प्रकारांचं तपशीलवार विश्लेषण आढळतं. बँकेकडून खेळत्या भांडवलासाठी कर्ज उचलायचं असेल तर मग, आपल्या कच्च्या मालाचा साठा कृत्रिम पद्धतीनं वाढवून दाखवणं, एकच साठा दोन-तीन वेगवेगळ्या बँकांकडे गहाण टाकणं किंवा व्यवसायातली येणी कृत्रिमरीत्या वाढवून दाखवणं अशा प्रकारचे वेगवेगळे खेळ अनेक व्यवसाय खेळतात.मात्र, वित्तपत्रकात सर्वात जास्त गमतीजमती करणारा वर्ग 'स्टार्टअप' नावाचा असतो. स्टार्टअप हे वेगळंच विश्व असतं. यातल्या बऱ्याच स्टार्टअप्स् तर महाविद्यालयीन मुलांच्या कल्पनेतून निर्माण झालेल्या असतात. सूचिबद्ध कंपन्यांचा पैसा, त्यांच्या समभागांच्या वाढणाऱ्या किमती आणि मग कुणी किती नफा कमावला हे दाखवायची स्पर्धा या नव-उद्योजकांना खुणावत असते.त्यांना सूचिबद्ध कंपन्यांप्रमाणे त्यांची विक्री तर वाढलेली दाखवायची असते; पण तोटाही फुगवून दाखवायचा असतो! या कंपन्यांचे मालक 'क्रिएटिव्ह' या प्रवर्गात मोडतात. विक्रीचे आकडे ताळेबंदात जादू करून फुगवायचे...मग फुगलेल्या आकड्यांवर गुंतवणूकदारांना भुलवायचं...गुंतवणूक आली की वारेमाप खर्च करायचे आणि या खर्चात मग स्वतः चे घरगुती खर्च,पगार, कमिशन आदी गोष्टी लपवायच्या. ज्या कंपनीत गुंतवणूकदार पैसे टाकत असतात त्या कंपनीमधून हळूहळू दुसऱ्याच व्यवसायात ते पैसे वळवायचे हादेखील या नव-उद्योजकांचा आवडीचा खेळ आहे. असो. तर, हे सगळं सांगायचं तात्पर्य काय तर, वित्तपत्रकांत फेरफार करण्याचे प्रत्येक प्रकारच्या व्यवसायाचे उद्देश वेगळे वेगळे असतात आणि ते एकदा माहीत असलं की मग ताळेबंद त्या पद्धतीनं वाचायला सोपे जातात. घोटाळे हे वित्तपत्रकातल्या माहितीतच दडलेले असतात. ते शोधायचे की शोधून न शोधल्यासारखं करायचं हा मात्र ज्याचा त्याचा प्रश्न!



# स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील विश्वशांती विद्यापीठ, पुणेचे संस्थापक, विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड

३ फेब्रुवारी २०२४ रोजी माईर्स एमआयटी या शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष, विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या वयाला ८३ वर्षे पूर्ण होऊन ते ८४ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. रामेश्वर (रुई) जि. लातूर सारख्या एका खेड्यातून व सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेल्या प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा शैक्षणिक प्रवास स्तिमित करणारा आहे. देशातील पहिल्या विश्वशांती विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली. भारतमातेचा चेहरा बदलणारे, स्वामी विवेकानंदाना अभिप्रेत असणारे युवक, या संस्थेत घडत आहेत. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. एस. एन. पठाण यांनी सदर लेखात घेतलेला हा आढावा.



संस्थेचे दूरदर्शी नेतृत्व

प्रा. डॉ. विश्वनाथ दादाराव कराड, एक निगर्वी विद्याथिप्रिय प्राध्यापक, कुशल प्रशासक, दूरदर्शी व्यक्तिमत्त्व, त्यांनी १९८३ साली माईर्स एम.आय.टी. या संस्थेची पुणे येथे स्थापना केली व १९९६ साली 'विश्वशांती केंद्रा'ची स्थापना करून विविध सभा-परिषदांचे देशात व परदेशात आयोजन केले. डॉ. विश्वनाथ कराड मूळचे हाडाचे वारकरी. त्यांच्या कल्पनेतून आणि तळमळीमधून इंद्रायणीतीरी दगडी भक्कम घाट बांधले गेले व आळंदी आणि देहू या तीर्थक्षेत्रांना 'ज्ञानतीर्थ क्षेत्र' म्हणून ओळख मिळाली. १९९८ साली युनेस्कोने त्यांना जगामध्ये शांतीचा प्रसार करण्यासाठी अध्यासन बहाल केले. सदैव गुणवत्तेचा ध्यास, सर्वच महाविद्यालये/संस्थांना नॅकचे 'ए' क'माकांचे मूल्यांकन, तर सर्व महाविद्यालय/संस्थांना एन.बी.ए.चे मानांकन लाभलेला हा शैक्षणिक परिसर. सर्व महाविद्यालयांच्या इमारती, रचना, बांधकाम हे प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून आणि चिंतनातून व प्रत्यक्ष कृतीतून साकार झाल्या आहेत. संस्थेसाठी रात्रंदिन झटणारे असे हे दूरदर्शी नेतृत्व संस्थेला लाभले आहे.

शैक्षणिक वातावरणाचा आदर्श वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे चा सुंदर परिसर

पुणे शहराच्या पश्चिमेला कोथरूड या उपनगरात हिरव्यागार वृक्षराजींनी नटलेल्या दोन टेकड्यांच्या कुशीत माईर्स एम.आय.टी. या शैक्षणिक संस्थेचा परिसर कुणालाही लगेचच मोहित करेल असा सजलेला आहे. रोमन व भारतीय संस्कृतीची शिल्पकलाकृती सांगणार्या भव्य इमारती, रॉयल पामची झालर, लॉन्स आणि अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने वागणारे हजारो तरुण-तरुणी. या विद्यार्थ्यांशी बोलताना असे जाणवते की, जगप्रसिद्ध एम.आय.टी. या संस्थेचेच ते विद्यार्थी आहेत, हा भावार्थ त्यांच्या चेहर्यावरून जणू ओसंडत असतो. प्राचीन वारसाहक्क सांगेल अशा प्रकारची सुंदर दगडी प्रशासकीय इमारत, त्यावरील घुमट (डोम) आणि त्यापुढे संत ज्ञानेश्वरांची मूर्ती हे एम.आय.टी. संस्थेचे जणू स्थापत्य ब'ँडच झाले आहे. याच प्रशासकीय इमारतीमध्ये प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचे मु'यालय आहे.

भारतीय संस्कृतीच्या चिरंतन मूल्यांचा अंतर्भाव

२१व्या शतकामधे जगावर विज्ञान, माहिती तंत्रज्ञान आणि विविध माध्यमे, दूरदर्शन, अनेक वाहिन्या यांचे जणू आक'मणच झालेले आहे आणि याचे काही दृष्य प्रतिकूल परिणामही दिसू लागले आहेत. जे जे पाश्चिमात्य आहे तेच उत्तम आहे, अशा प्रकारचा विचार तरुणांच्यामध्ये बळावतो आहे. पाश्चिमात्यांच्या चालीरीतींचे अंधानुकरण फार मोठ्या प्रमाणावर आज तरुण पिढीमध्ये दिसते, यामुळे प्रा. कराड सर व्यथित होतात. तरुणांच्यामधे भारतीय अस्मितेचा जागर करावयास हवा हे आता त्यांनी ठरवून टाकले आहे. भारतीय संस्कृतीची मूल्ये विद्यार्थ्यांनी समजून घेतली पाहिजे व त्याप्रमाणे त्यांच्यावर संस्कार झाले पाहिजे, यासाठी प्रा. डॉ. कराड सर सतत आग'ही असतात. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव व अतिथीदेवो भव ही भारतीय संस्कृतीची मु'य अशी चिरंतन विश्वात्मक मूल्ये आहेत. भारतीय तरुणांमध्ये हे रुजविण्यासाठी स्वतंत्र विभाग सदर विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेला आहे. यासाठी 'संचालक, सामाजिक शास्त्रे व मूल्याधिष्ठित शिक्षण' यासाठी अनुभवी प्राध्यापकाची विद्यापीठात नेमणूक करण्यात आली आहे.

वैश्विक मूल्याधिष्ठित शिक्षण आणि यशस्वी व्यक्तिमत्त्वविकास

वैश्विक मूल्याधिष्ठित शिक्षण आणि यशस्वी व्यक्तिमत्त्वविकास' ही राज्यस्तरावर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी स्वायत्त प्रमाणपत्र परीक्षा दरवर्षी जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसर्या रविवारी घेतली जाते आणि त्यासाठी विद्यार्थ्यांना दिली जाणारी लाखो रुपयांची बक्षिसे हे सर्व पाहिल्यानंतर भारतीय अस्मिता तरुणांच्यामध्ये जागविण्याचा प्रा. डॉ. कराड सर यांनी ध्यास घेतला आहे असेच म्हणावे लागेल. विद्यापीठाच्या अभ्यासक'मात या प्रगत अभ्यासक'माचा समावेश करण्यात आला आहे. रामेश्वर (रूई), ता. जि. लातूर या त्यांच्या जन्मगावी श्रीराम मंदिर, जामा मस्जिद, ह. जैनुद्दीन चिश्तींचा दर्गा, श्रीराम-रहीम सेतू आणि तथागत गौतम बुद्ध विहार बांधून त्यांनी जणू रामेश्वर (रूई) येथे मानवतातीर्थच स्थापन केले आहे. या सर्व स्थळांना विश्वशांती विद्यापीठाची प्रयोगशाळाच म्हणावी लागेल. प्रा. डॉ. कराड सरांच्या या सांप्रदायिक सद्भावाच्या कार्यामुळेच त्यांना अमेरिकेत युटा प्रांतातील 'सॉल्ट लेक' येथे भरलेल्या नवव्या जागतिक धर्मसंसदेत प्रमुख भाषण देण्यासाठी २०१५ मध्ये निमंत्रित करण्यात आले होते.

१० वर्षांनंतर विश्वशांती विद्यापीठाचे स्वप्न साकार

दि. २ जानेवारी २००७ रोजी युनेस्को पॅरिस या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी तत्कालीन भारताचे मनुष्यबळ विकास मंत्री यांचेमार्फत भारतात विश्वशांती विद्यापीठ सुरू करावे असा प्रस्ताव दिला होता. २०१७ रोजी तब्बल १० वर्षांनी का होईना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचे स्वप्न प्रत्यक्षात आले आणि महाराष्ट्र शासनाने 'प्रा. डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस विद्यापीठास' मान्यता दिली. ए.डी.टी. विद्यापीठाच्या परिसरात (लोणी काळभोर, पुणे) त्यांनी बांधलेला संत ज्ञानेश्वर - तुकाराम महाराज विश्वशांती सभागृह जगातील सर्वात मोठा घुमट म्हणून त्यास जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. हा घुमट म्हणजे अध्यात्म शास्त्राची वैज्ञानिक प्रयोगशाळा अर्थात मानवता भवन ही मा. डॉ. कराड सरांची जगाला सर्वात मोठी देणगी आहे.

स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील विद्यापीठ

हे सर्व पाहिल्यावर असे वाटते की, जणू विश्वशांती वर्ल्ड पीस विद्यापीठाच्या रूपाने पुणे येथे स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील विद्यापीठच साकार झाले आहे. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेच्या अभूतपूर्व यशानंतर स्वामी विवेकानंद भारतीय युवकांना आवाहन करताना तेव्हा म्हणाले होते की, भारत पुन्हा उठेल-संदेहच नाही, पण जडाच्या शक्तीने नव्हे तर चैतन्याच्या शक्तीने विनाशाचा झेंडा नाचवून नव्हे, तर शांती-प्रेमाची पताका फडकवीत... म्हणजेच वैराने नव्हे तर सद्भावाने. पुढे स्वामीजी स्पष्टच म्हटले होते की, रामकृष्णांच्या चरणस्पर्शाने जे मूठभर तरुण घडविले गेलेले आहेत... सध्या ते वीस आहेत. उद्या त्यांची सं'या दोन हजार करून सोडा... स्वामीजींचे ते बोल कसे सत्यात आले पहा. रामेश्वर (रुई) या एका अत्यंत खेड्यातून आलेला विश्वनाथ कराड नावाचा एक मुलगा आपल्या इंजिनिअरिंग विषयाची पुस्तके पुणे येथील आप्पा बळवंत चौक येथे घेण्यासाठी जातो व योगायोगाने आठ आणे किमतीचे ते ढर्हीी ‍ीशिरङ्ग तर्ळींशङ्गरपरपवर हे छोटेखानी पुस्तक त्याच्या हाती पडते व हा युवक पुढे स्वामीजींचा पक्का शिष्यच होतो. जीवनभर तो स्वामींजींचे तत्त्वज्ञान घेऊन जगतो व भारतातील एकमेव विश्वशांती विद्यापीठाची स्थापना करतो आणि स्वामीजींचे तत्त्वज्ञान आपल्या प्रत्यक्ष कृतीने जगापुढे ठेवतो.

या विश्वशांती विद्यापीठातून आता १०,००० आदर्श विद्यार्थी तयार होत आहेत. पुढे ते १ लाख होतील आणि या विश्वशांती विद्यापीठाच्या माध्यमातून स्वामीजींचे सद्भावनेचे, प्रेमाचे एकात्मतेचे तत्त्वज्ञान स्पष्टपणे जगापुढे येईल, हा केवळ योगायोग नाही.

**लेखक - डॉ. एस. एन. पठाण**
**माजी कुलगुरु,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

# जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिले महिलांना आत्मनिर्भर होण्याचे धडे !

लातूर, दि. २ (जिमाका): ग्रामपंचायत स्तरावर १५ वा वित्त आयोगातून आरोग्य, शिक्षण व उपजीविका या अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा सुरु आहेत. या प्रशिक्षणामुळे महिला सबलीकरणास प्रोत्साहन मिळेल. तसेच महिलांना रोजगार मिळण्यास आणि व्यवसायाभिमुख कर्ज मिळण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले.




लातूर तालुक्यातील कृष्णा नगर येथील ग्रामपंचायतीमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षणास बुधवारी भेट दिल्यानंतर श्री. सागर बोलत होते. यावेळी प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित महिलांना त्यांनी मार्गदर्शन केले. कौशल्य विकास प्रशिक्षण घेतल्यामुळे महिला आत्मनिर्भर होवून समृध्द जिवनाची वाटचाल करु शकतील. या प्रशिक्षणामुळे महिला लाभार्थींना रोजगार मिळण्यास मदत होईल. तसेच व्यवसायाभिमुख कर्ज सहजरित्या महिलांना उपलब्ध होवू शकेल , असे श्री. सागर यांनी सांगितले.

कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी प्रशिक्षणामुळे होणारे फायदे सांगून त्यांना बँकेमार्फत मिळणाऱ्या कर्जाबाबत माहिती दिली. यावेळी दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, सौदर्य प्रसाधने निर्मिती, बेकरी पदार्थ निर्मिती, चॉकलेट पदार्थ निर्मिती व उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण पुस्तिका व नॅशनल स्कील डेव्हलपेंट कार्पोरेशन पुरस्कृत संस्थेचे प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांनीही कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेतील उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. तसेच सरपंच लिंबाबाई ज्ञानोबा जाधव यांनी कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवून उपस्थितांचे आभार मानले.

# हिवाळ्यात गूळ खाण्याचे आहेत भरपूर फायदे... मात्र 'या' गोष्टींची खबरदारी घेणं आवश्यक! जाणून घ्या

गूळ खाण्याचे अनेक फायदे आहेत. चविष्ट असण्यासोबतच गुळाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत आणि रिफाइंड साखरेचा एक उत्तम पर्याय देखील आहे. गुळाच्या अगणित फायद्यांमुळे, त्याचा वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.गुळात विविध पोषक घटक असतात. त्यात जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने आणि सेलेनियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई इत्यादी अँटीऑक्सिडंट असतात. खरे तर प्रत्येक घरात गूळ असणे आवश्यक आहे. साखरेला गुळ हा उत्तम पर्याय असला तरी गुळाचे गुणधर्म समजून घेणे गरजेचे आहे. तुम्हीही गुळाचे सेवन करत असाल तर या ३ गोष्टींबद्दल नक्की जाणून घ्या.१. नेहमी १ वर्ष जुना गूळ वापरा नवीन गुळाच्या तुलनेत जुन्या गुळाचे अनेक आरोग्य फायदे आहेत. जुन्या गुळाचा वापर अनेक आयुर्वेदिक औषधे बनवण्यासाठी केला जातो. यकृत आणि स्प्लीन कंडीशन्समध्ये हे फायदेशीर आहे. हे हृदयासाठी चांगले आहे आणि वात संतुलित करते. जुन्या गुळाची चव किंचित खारट आणि रंग किंचित गडद असते.२. गूळ आणि दूध एकत्र घेऊ नये गूळ आणि दूध एकत्र घेऊ नये. दूध आणि गुळात विरुद्ध गुणधर्म असतात कारण गूळ गरम असतो तर दूध थंड असते. गूळ फायदेशीर आहे आणि त्यात जीवनसत्त्वे, फॉस्फरस, लोह, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम असतात, परंतु दुधासोबत त्याचे मिश्रण हानिकारक असू शकते.

३. गुळाची शुद्धता बाजारात उपलब्ध असलेला हलका रंगाचा गूळ सहसा शुद्ध नसतो हे समजून घेणे आवश्यक आहे.

सोडियम बायकार्बोनेट आणि कॅल्शियम कार्बोनेट यांसारखे पदार्थ गुळाला हलका रंग आणतात. गोल्डन ब्राऊन किंवा गडार्क ब्राउन कलरचा गूळ शुद्ध मानला जातो.

# हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे ब्राऊन राईस, आजच करा आहारात

निरोगी आरोग्य हवे असेल, तर तुम्हाला त्यासाठी संतुलित आहार आणि नियमित व्यायाम करावा लागेल. या दोन्हींची सांगड घातली की, तुमचे आरोग्य उत्तम राहते. परंतु, आजकालचे धकाधकीचे जीवन, बिघडलेली जीवनशैली, अपुरा आहार आणि व्यायामाच्या अभावामुळे आरोग्याच्या अनेक समस्या सुरू झाल्या आहेत.या समस्या दूर करण्यासाठी तुम्ही रोजच्या आहारात काही निरोगी खाद्यपदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे. यासोबतच नियमित व्यायाम, योगा आणि मेडिटेशन करणे देखील फायद्याचे आहे. निरोगी खाद्यपदार्थांमध्ये ब्राऊन राईसचा देखील समावेश आहे.या ब्राऊन राईसमुळे वजन कमी करण्यास मदत होते. यासोबतच याचे इतर अनेक फायदे आहेत. आज आपण ब्राऊन राईसच्या या आरोग्यदायी फायद्यांबद्दल जाणून घेणार आहोत.ब्राऊन राईस खाण्याचे आरोग्यदायी फायदे खालीलप्रमाणे :रोगप्रतिकारक शक्ती वाढते ब्राऊन राईसचे सेवन केल्याने आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. ब्राऊन राईसमध्ये व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि इतर पोषकघटक मोठ्या प्रमाणात आढळून येतात. हे सर्व घटक आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि आपल्याला तंदूरूस्त ठेवतात. जर तुम्हाला ही तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवायची असेल, तर तुमच्या आहारात ब्राऊन राईसचा समावेश अवश्य करा.मधुमेहासाठी लाभदायी जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुमच्या आहारात ब्राऊन राईसचा अवश्य समावेश करा. मधुमेहाच्या रूग्णांनी ब्राऊन राईसचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहण्यास खूप मदत होते. खास करून टाईप-२ मधुमेह असणाऱ्यांनी ब्राऊन राईसचे सेवन अवश्य करावे. डॉक्टर अनेकदा मधुमेहाच्या रूग्णांना ब्राऊन राईसचे सेवन करण्याचा सल्ला देखील देतात.हृदयासाठी फायदेशीर ब्राऊन राईसमध्ये फायबर्स आणि मॅग्नेशिअमचे भरपूर प्रमाण आढळून येते. या दोन्ही प्रमुख घटकांमुळे हृदय निरोगी राहण्यास मदत होते. हृदयविकाराच्या धोक्यापासून बचाव करण्याचे काम मॅग्नेशिअम करते. त्यामुळे, तुमच्या आहारात ब्राऊन राईसचा अवश्य समावेश करा. यामुळे, तुमचे हृदय निरोगी राहण्यास मदत होते.

# किनवट पोलीस स्टेशन भव्य इमारतीचा लवकरच शुभारंभ

किनवट / ता. प्रतिनिधी.शेख शौकत :- किनवट पोलीस स्टेशनचा कारभार एका छोट्या जीर्ण झालेल्या निजाम कालीन इमारतीतून चालत होता. बऱ्याच वर्षाच्या प्रतीक्षेनंतर त्याच ठिकाणी पोलीस स्टेशन ३ कोटीची सुसज्ज इमारती चा भुमीपुजन शुभारंभ ३० मार्च २०२३ रोजी झाला व १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत इमारतीचे संपूर्ण काम होणार असून पोलीसांना लवकरच नविन इमारतीमध्ये फेब्रुवारी महिण्यात प्रवेश मिळणार . त्या पोलीस ठाणे इमारतीचा शुभारंभ ही फेब्रु. २०२४ मध्येच होणार असल्याची माहिती प्राप्त झाली .




सविस्तर वृत्त असे की किनवट पोलीस स्टेशन इमारत ही शहराच्या मधोमध असून ती इमारत निजाम कालीन इमारत होती पावसाळ्यामध्ये त्या इमारतीमध्ये पोलिसांना मोठी कसरत करावी लागत होती तसेच पोलिसांना निवासस्थान नसल्याने अनेक ठिकाणी भाड्याने घरे घेऊन राहावे लागते . मोडकळीस आलेल्या इमारतीचा व निवास स्थानाकरीता वृत्तपत्राने नवीन इमारत मागणीचा पाठपुरावा केल्यानंतर त्यास शासणाने प्राधान्य देत पोलीस ठाणे इमारतसाठी ५००० स्क्वेअर फिट मध्ये सुसज्य इमारत बांधकाम टेंडर निघाले . परिसरामध्ये अनेक ठिकाणी बांधकाम व विकास कामाचे गुणवत्ता पाहता ढीसाळ कामे निदर्शनास येतात परंतु ३ कोटी रुपयाची पोलीस ठाण्याची इमारत बांधकाम ३० मार्च २०२३ रोजी भूमिपूजन सोहळा संपन्न झाला असून एकंदर तीन कोटी रुपयाचे बांधकाम व संपुर्ण फर्णीचर , स्वरउर्जा, गार्डन सह पल्लवी कंट्रक्शन नांदेड यांना दिले असून संबंधित गुत्तेदारांनी युद्ध पातळीवर दर्जेदार व दर्जे दार साहित्य वापरून सुसज्ज इमारत बांधकामास सुरुवात झाली . संबंधित गुत्तेदारांना बांधकाम कालावधी चा पिरेड त्यांनी १५ फेब्रुवारी पर्यंत इमारत पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्याचा होता . त्याप्रमाणे तीन कोटी शासनाचे रुपये योग्य त्या मार्गी लागत दर्जेदार काम होत असल्याचे चित्र शहरातील पोलीस ठाणे इमारती मध्ये दिसत आहे . लवकरच १५ फेब्रुवारी किंवा फेब्रुवारी अखेरपर्यंत नवीन इमारतीमध्ये नवीन फर्निचर सह पोलीसांना प्रवेश मिळणार असल्याची माहिती प्राप्त झाली .

सदरील इमारतीचे साठी शासनाने तीन कोटी रुपये लक्ष खर्च केले असून पाच हजार चौरस मीटर मध्ये ही इमारत दोन मंजिल झाली आहे यामध्ये पोलीस निरीक्षक, पोलीस सहाय्यक निरीक्षक,ठाणे अंमलदार,रायटर रूम,वायरलेस कक्ष, दिव्यांगासाठी शौचालय ट्रॅक,व दुसऱ्या मजल्यावर सभागृह,रेकॉर्ड रूम,शस्त्र गार रूम,मुद्देमाल रूम सह महिला पोलीस व पुरुष पोलिसांकरिता रेस्ट रूम प्रांगणामध्ये विशेष झांडाची बगीचा असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे .

सुसज्ञ इमारत व दर्जेदार फर्निचर यामुळे शासनाचा निधी हा व्यवस्थितरित्या वापरल्या गेल्याचे चित्र यामध्ये निदर्शनास येत असून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी येथे निवासस्थान नसून त्यांची जुनी निवासस्थान इमारत मोडकळीस आली आहे व ती केव्हाही पडून यापासून जवळपासच्या नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही .तात्काळ नवीन पोलीस निवास इमारत देण्याची मागणी जोर धरत असून त्याचा इमारत दर्जा पोलीस ठाणे इमारत समान देर्जेदार कामे व्हावी तशाच दर्जेदार काम करणाऱ्या गुत्तेदारास दण्यात यावे अशी मागणी पोलीस कर्मचाऱ्यांसह सामान्य नागरिकांमधून जोर धरत आहे

# अंगावर तीळ आहेत? काय कराल?

चेहऱ्यावरचा तीळ काहींना ब्युटी स्पॉट वाटतो, तर काहींना त्याचा त्रास होतो. पण मुळात हे तीळ का येतात, त्यामागची प्रक्रिया काय असते, तीळ येणे यात गंभीर काही असते का आणि त्यावर उपचार करता येतात का या साऱ्या प्रश्नांना तज्ज्ञांनी दिलेली उत्तरे डॉ. किरण नाबर त्या दिवशी वीस वर्षाची मंजिरी माझ्या दवाखान्यात आली. म्हणाली, डॉक्टर, बघा ना किती तीळ आलेत माझ्या चेहऱ्यावर. माझ्या मैत्रिणी तर मला चिडवतात, तिळांची चटणी तरी करून खा. एक तीळ ७ जणांनी वाटून घ्यावा असे म्हणतात. या तिळांचे पण तसे करता आले असते तर किती बर झालं असतं. मला तर माझ्या चेहऱ्याकडे बघायलाच कसतरी वाटतं.तीळ हे बऱ्याच जणांना असतात. किंबहुना बहुतेकांना अंगावर कुठेतरी एखादा तरी तीळ असतोच. कुठे अंगावर एखादी खूण आहे का असं अर्जामध्ये लिहायचं असल्यास आपण कुठे तीळ आहे का ते शोधतो. म्हणजेच तीळ हा एक खुणेचा प्रकार आहे व तो आला की नंतर जात नाही हे सर्वसामान्यांना माहीत असतं. आज या तिळाबद्दल आपण थोडे आणखी जाणून घेऊ. तीळ म्हणजे काय? तीळ म्हणजे एक प्रकारची खूण आहे की जी रंगांच्या पेशींच्या समूहापासून तयार झालेली असते. तीळ म्हणजे काळ्या रंगाचा छोटासा डाग किंवा पुळी किंवा छोटीशी गाठ असते. पण ती एक सौम्य (लशपळसप) गाठ असते. मेलानोमाप्रमाणे रंगपेशींच्या कॅन्सरची गाठ नसते. तीळ हा जन्मानंतर कधीही येऊ शकतो. लहान मुले, पौगंडावस्थेतील मुले तसेच गरोदर स्त्रिया व तीस वर्षापर्यंतच्या व्यक्ती यांमध्ये तीळ येण्याचे प्रमाण जास्त असते. त्यानंतर ते कमी कमी होत जाते. अतिवयस्कर माणसांमध्ये तर असलेले तीळदेखील हळूहळू निघून जातात. स्त्री व पुरुषांमध्ये तीळ होण्याचे प्रमाण सारखेच असते. ज्यांची त्वचा अति गोरी आहे अशांमध्ये तीळ होण्याचे प्रमाण जास्त असते. जन्मजात जर एखाद्याला गडद काळ्या किंवा गडद तपकिरी रंगाची, जाड, आकाराने मोठी व केसाळ खूण असेल तर तिला तीळ म्हणता येणार नाही. तिला रंगापेशींची जन्मखूण किंवा लेपसशपळींरश्र झळसाशपींशव म्हणतात.तीळ का येतात?



तसं पाहायला गेल्यास आपल्या त्वचेमध्ये रंगाच्या पेशी ह्या त्वचेच्या इतर पेशींप्रमाणे एकमेकांच्या फार जवळ नसतात. त्या एकमेकांमध्ये अंतर ठेवून असतात. तीळ असलेल्या ठिकाणी मात्र या रंगाच्या पेशी एकमेकांच्या फार जवळ असतात व त्यांचाच एक संग्रह किंवा समूह तयार होतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सूर्यप्रकाश. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणांमुळे रंगांच्या पेशींना चालना मिळते व त्यामुळे तीळ तयार होतात. याच कारणामुळे तीळ शक्यतो चेहरा व जिथे ऊन पडते अशा ठिकाणी जास्त करून पहावयास मिळतात.असे असले तरी तीळ होण्यासाठी अनुवंशिकतादेखील कारणीभूत असते. त्यामुळे आपण पाहतो की, आई-वडिलांना तीळ असण्याचे प्रमाण जास्त असेल तर मुलांना देखील तीळ जास्त असतात. त्वचा उन्हामुळे किंवा अन्य काही कारणामुळे भाजली गेल्यास, तसेच गोळ्यांची तीव्रप्रकारे ॲलर्जी येऊन त्वचा भाजल्यासारखी झाल्यास, रंगाच्या पेशींना हानी पोहोचते व त्यानंतर देखील त्या भागात तीळ येऊ शकतात. रंगांच्या पेशी ह्या आपले उन्हापासून संरक्षण करत असतात. त्यामुळे ज्यांच्या त्वचेचा रंग जास्त गडद आहे अशा व्यक्तींना तीळ असण्याचे प्रमाण कमी असते. याउलट ज्यांची कातडी फार गोरी आहे अशा व्यक्तींमध्ये तीळ असण्याचे प्रमाण हे जास्त असते. तीळाचे काही प्रकार असतात का? तीळ एकूण तीन प्रकारचे असतात. एक प्रकार म्हणजे त्वचेवर १ ते ३ मिलीमीटरचा छोटासा एकदम काळ्या रंगाचा डाग येतो. हा त्वचेला लागून असतो. दुसरा प्रकार म्हणजे मसूर डाळी एवढी काळ्या रंगाची हा तीळ कमी काळा व कधी कधी त्वचेच्या रंगाचाही असतो. कधीकधी या तीळामध्ये केसदेखील वरती आलेले दिसतात.तीळामध्ये मेलानोमा म्हणजेच रंगाच्या पेशींचा कर्करोग होऊ शकतो का? आशियाई लोकांची त्वचा निमगोरी , गव्हाळ किंवा गडद गव्हाळ रंगाची असते. या त्वचेमध्ये तीळाचे रुपांतर मेलानोमा म्हणजेच रंगापेशींच्या कर्करोगामध्ये होण्याची शक्यता खूप कमी असते. ज्या लोकांची त्वचा अतिगोरी असते त्यांना हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. जो तीळ आकाराने मोठा व त्वचेच्या पातळीच्या वर असतो त्या तीळा मध्ये मेलानोमा होण्याची शक्यता फार कमी असते.

# संभाजी महाविद्यालयात भूगोल दिन व रासेयो स्वयंसेवक उद्बोधन कार्यक्रम संपन्न




मुरुड/महेंद्र आल्टे: येथील संभाजी महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने राष्ट्रीय भूगोल दिन साजरा करण्यात आला. यावेळी भूगोल व रा.से.यो विभाग यांच्या संयुक्त उपक्रमातून स्वयंसेवक उजळणी कार्यक्रम घेण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य मा. डॉ. ए. डी. काळम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी संचालक तथा मा.भूगोल विभाग प्रमुख मा. डॉ. बी .एस. बिडवे हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर येथील भूगोल विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मगर होते. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रो.डॉ. जी. एल. जाधव यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक डॉ. बी.एस. बिडवे यांनी आपल्या भाषणात भूगोल विषयाचे महत्त्व आणि उपलब्ध संधी यावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की भूगोल ही सर्व शास्त्राची जननी आहे. भूगोलाचा अभ्यास करणारा विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होतो असा ठाम विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी भूगोलाची नवनवीन तंत्रे आत्मसात केल्यास अनेक क्षेत्रात त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात याची अनेक उदाहरणे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. भूगोल विषया बरोबरच त्यांचा एन.एस.एस. मधील दीर्घ अनुभव आणि एन.एस.एस मधील विद्यार्थी कुठपर्यंत पोहोचू शकतो याची ज्वलंत उदाहरणे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. मी आज तुमच्यासमोर उभा आहे, तो केवळ भूगोलाचा विद्यार्थी, एन.सी.सी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक येथून सुरू झालेला प्रवास कार्यक्रमाधिकारी, जिल्हा समन्वयक, मुंबई विद्यापीठ रा.से.यो संचालक यामुळे इथपर्यंत पोहोचू शकलो. माझ्या जडणघडणीत भूगोल विषयाच्या अभ्यासाबरोबरच एन. एस.एस व एन.सी.सी या दोन विभागाचे खूप मोठे योगदान आहे. हे विभाग माझ्या जीवनामध्ये 'दो बूँद जिंदगी के' आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. च्या माध्यमातून आपला व्यक्तिमत्व विकास घडवावा, नोकरी, व्यवसाय, रोजगार यांना प्राधान्यक्रम द्यावे व देशाचा एक सुजाण नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. ए. डी काळम यांनी केला. अध्यक्षीय समारोपात बोलताना त्यांनी स्वयंशिस्त व वेळेचे नियोजन या तंत्राचे दैनंदिन जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. भूगोल दिनाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस.एन. उबाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. अनुराधा क्षीरसागर हिने मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद प्रा. डॉ. डी.एम. रणदिवे, प्रा. आबाजी सूर्यवंशी, डॉ. तहेसीनबी आतार, प्रा. शैलेंद्र सुतार आणि भूगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी- विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. एच. एस. वाघमारे, प्रा. डॉ..एस. एन. उबाळे, डॉ. जी.एल. जाधव, कार्यक्रमाधिकारी डॉ . जी.एम. भगत, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा. एम. बी. गायकवाड, भूगोल व रा.स.यो. विभागातील विदयार्थी -विद्यार्थीनी यांनी प्रयत्न केले.

# कोरेगाव भीमा ऐतिहासिक जयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढा...येत्या रविवारी मानखुर्द मध्ये जनजागृती अभियान....

मुंबई : कोरेगाव भीमा येथे माळवदकर कुटुंबाने ऐतिहासिक जयस्तंभ आणि जयस्तंभ परिसरातील जागेवर अतिक्रमण केले असून त्या अतिक्रमणाच्या विरोधात भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग समितीच्या माध्यमातून न्यायालय लढाई लढत आहे. ही न्यायालयीन लढाई अत्यंत व्यवस्थित सुरू असताना ज्यांनी अतिक्रमण यांनी केलं त्या माळवदकर कुटुंबातील एका सदस्यांनी मागील आठवड्यात जयस्तंभ आमची खाजगी मालमत्ता आहे अशा प्रकारचे विधान केल्यामुळे आंबेडकरी जनतेमध्ये मोठा संताप आणि संभ्रम निर्माण झालेला आहे. हा जयस्तंभ नेमका कुणाचा? हे जाणून घेण्यासाठी चेंबूर मधील सिध्दार्थ कॉलनी मधील काही तरुणांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ अतिक्रमण व न्यायालय लढा या विषयावर दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान ठेवलं होतं. त्या व्याख्यानाला सिद्धार्थ कॉलनीतील रहिवाशांनी प्रचंड असा प्रतिसाद दिला. अभियानामध्ये सामील झालेले आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहन सोनवणे हे सुद्धा उपस्थित होते. त्यांनी हे व्याख्यान ऐकल्यानंतर आपल्या मानखुर्द विभागात सुद्धा अशा प्रकारचे व्याख्यान झालं पाहिजे अशा प्रकारची मागणी केल्यानंतर त्यांच्या विनंतीला मान देऊन येत्या रविवारी दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी विश्वभूषण बुद्ध विहार,, बिल्डिंग नं. ६७ शेजारी, शिवम शाळेसमोर, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द मुंबई ४३ येथे सायंकाळी ६.३० वाजता कोरेगाव भीम जयस्तंभ अतिक्रमण व संविधानिक न्यायालयीन लढा या विषयावर भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान ठेवले असून अस्मितेचा व गंभीर विषय समजून घेण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहन सोनवणे, सर्जे राव कांबळे, तानाजी कांबळे, खंडीझोड साहेब, दादा उघडे, बाजीराव उबाळे, सुधाकर पारखे, रंगनाथ रणशेवरे, गमरे, हिम्मतराव मोरे, राज सुरवाडे, राज मेढे आणि सर्व लल्लुभाई मधील पुरुष आणि महिला सामाजिक कार्यकर्ते यांनी आवाहन केले आहे.

# प्रा. डी. आर. चव्हाण यांना पुरस्कार




मुरूड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डी. आर. चव्हाण यांना राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दि.२५/०१/२०२४ रोजी दयानंद सभागृह, लातूर येथे संपन्न झालेल्या सोहळ्यात मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीसाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रम कार्यासाठी लातूरच्या जिल्हाधिकारी मा. श्रीमती वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते उत्कृष्ट नोडल अधिकारी पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. बी.एस.(दादा) पटाडे, संस्थेचे सचिव मा. ॲड. व्ही. वाय. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच निवडणूक साक्षरता मंडळ सदस्य प्रा. डॉ.एम. व्ही. चावरे, प्रा. डॉ. जी. एम.भगत यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शाळेत शिकविण्याबरोबर समाजासाठी झटणाऱ्या शिक्षकांचा नेहमी समाजात सन्मान होतो.गणेश उके



वर्धा : - आंबेडकरी विचाराचे शिक्षक नेहमी महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात अग्रेसर असतात. या शिक्षकांमध्ये बुद्धाची करुणा भरून असल्याने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना नेहमी मदत करतात. सोबतच ते वंचित समाजाचा अभ्यास करून त्यांना मदत करून सुमार्गावर आणण्याचा सतत प्रयत्न करतात. शाळेत शिकविण्याबरोबर समाजासाठी झटणाऱ्या अशा शिक्षकांचा नेहमी समाजात सत्कार होतो असे प्रतिपादन स्वतंत्र मजदूर युनियनचे राज्य सचिव गणेश उके नागपूर यांनी केले. ते स्वतंत्र समता शिक्षक संघ द्वारा आयोजित शिक्षक परिषदे मध्ये बोलत होते. तसेच नागपूर येथे दिनांक १७ व १८ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनास तन-मन धनाने सहकार्य करून उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी शिक्षकांना केले.

स्वतंत्र समता शिक्षक संघाच्या वतीने वर्धा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्हा शिक्षक मेळावा,सेवानिवृत्त शिक्षकांचा सेवापूर्ती सन्मान,दिनदर्शिकेचे विमोचन व नव्या शिक्षण धोरणाविषयीच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वतंत्र मजदूर युनियनचे राज्य सहसचिव गणेश उके नागपूर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.मिलिंद सवाई,निवृत्त शिक्षणाधिकारी धनराज तेलंग,स्वतंत्र समता शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष सुनील तेलतुंबडे,सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी धनराज तायडे,राज्य कार्याध्यक्ष राजेंद्र गेडाम चंद्रपूर,राज्यसचिव धर्मेंद्र अंबादे उपस्थित होते.

यावेळी एकूण सहा अधिकारी यांच्या सामाजिक कार्याचा,एकोणचाळीस निवृत्त शिक्षकांचा तर तीन आदर्श शिक्षकांचा शाल सन्मानचिन्ह व बुके देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप्ती फुलझले व मंगला कांबळे यांनी,प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष गौतम पाटील तर आभार जिल्हा सरचिटणीस प्रयोग तेलंग यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन शंभरकर, सतीश फुलझेले,सुरेश ढेपे,पुष्पराज झिलटे,भोजराज नगराळे,विलास पखाले, दिलीप गाडगे,प्रफुल कांबळेराजकुमार मून, सुरेश ताजने,संतोष झाडे,राजेंद्र ताकसांडे,शंकर निमसरकर,सुभाष ताकसांडे,सुरेखा ढाले,विक्रम तामगाडगे,बुद्धपाल कांबळे,प्रकाश पखाले,गौतम वासे,वसुधा वनकर, मंदा वावरे,वंदना नगराळे,सुरेखा खोंडे,दिलीप कांबळे,महेंद्र जंगले,घनश्याम थूल, बाबाराव जवादे,नरेश नगराळे,दिलीप वावरे,गोपाल ताजने,दीपक नगराळे,अजय कुंभारे,रवींद्र ब्राह्मणे,सुरेश सोनटक्के,रवींद्र खेडकर,सुनील मनिकुल,अविनाश कांबळे,प्रशांत ढोले,गौतम सोनटक्के,विवेक मेश्राम व इतरांनी परिश्रम घेतले. गौतम पाटील यांसकडून अध्यक्ष स्वतंत्र समता शिक्षक संघ वर्धा जिल्हा.

# उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचा आंतरशालेय सांस्कृतिक कार्यक्रम

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचा आंतरशालेय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले असुन या कार्यक्रमात क्रीडा महोत्सवा निमित्त पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला आहे. उल्हासनगर महापालिकेच्या शिक्षण विभागाने सन २०२३ ते २०२४ साठी आंतर शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन येथील टाऊन हॉल मध्ये आयोजित करण्यात आले . या कार्यक्रमात क्रीडा महोत्सवा मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या वेळी अंबरनाथ विधानसभेचे आमदार डॉ. बालाजी किणीकर , उल्हासनगरचे आमदार श्री. कुमार आयलानी , उल्हासनगर महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख ,अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर , माजी नगरसेविका सौ. शितलताई बोडारे, उद्योजक श्री. धीरज आयलानी, उपायुक्त श्रीमती. प्रियांका राजपूत , उपायुक्त डॉ. सुभाष जाधव, उपायुक्त श्री.अशोक नाईकवाडे ,मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परिक्षक श्री. शरद देशमुख, शिक्षण विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री. दिपक धनगर, शिक्षण विभागाच्या उपलेखाधिकारी शितल कदम ,शालेय शिक्षण विभाग सदस्य, उल्हासनगर महापालिका अधिकारी वर्ग, तसेच विध्यार्थी गण उपस्थित होते. महाराष्ट्राची संस्कृती जपत कला कलागुणाने परिपक्व असा हा कार्यक्रम मोठ्या आनंदात साजरा केला.

# आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिला कार्यकर्त्या व पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे - मा.आ. प्रदीप नाईक.




किनवट / ता.प्र.शेख शौकत :- येत्या दोन महिन्यात ५ हजार महिलांच्या कार्यकारणीचे संघटन केले जाणार आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गाव तेथे राष्ट्रवादी माणूस तिथे घड्याळ रुजवण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन एन के गार्डन येथे दि. ३१ जानेवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस महिला कार्यकारणी नियुक्ती सोहळ्याच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी केले.

मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा महिला अध्यक्ष प्रांजलीताई रावणगावकर भोकर तालुका महिला अध्यक्ष सौ यशोदाबाई शेळके, सौ.बेबीबाई प्रदीप नाईक ,मंजुळाबाई प्रकाश राठोड यांच्यासह महिला पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होत्या.

सौ. बेबीताई प्रदीप नाईक,सुनंदा सुधाकर चिदलवाड, माधुरी बालाजी बामणे, अनुसया सत्यनारायण जमादार, उषाताई बालाजी वाढवे, उज्वलाताई तुषार मुंडावरे यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला येणाऱ्या काळात अच्छे दिन येणार असल्याचे म्हणत सर्वच महिलांनी आपापल्या गावात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. याप्रसंगी माजी आमदार प्रदीप नाईक ,जिल्हाध्यक्षा प्रांजलीताई रावणगावकर व मान्यवरांच्या हस्ते महिलांना नियुक्तीचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.सुनंदाताई चिदलवाड यांनी मनोगत व्यक्त करताना प्रजेला सोबत घेऊन चालणारा राजा म्हणजे माजी आमदार प्रदीप नाईक जो राजा प्रजेला किंमत देतो तसाच राजा निवडला पाहिजे त्यामुळे भूलथापांना बळी पडू नका माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा निर्धार केला. जिल्हाध्यक्षा प्रांजलीताई रावणगांवकर म्हणाल्या की 'सब लोगोकी एकही पुकार नाईक साहेब अब की बार' माजी आमदार प्रदीप नाईक हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांचे निष्ठावान मानले जातात. त्यांनी सत्तेची नाही तर सत्याची कास धरली. शरदचंद्र पवार साहेबांच्या विचाराचे खंदे समर्थक म्हणून प्रदीप नाईक यांची ओळख आहे. असेही रावणगांवकर म्हणाल्या. पुढे बोलताना रावणगावकर म्हणाल्या की प्रदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे किनवट मतदार संघातील काम पाहता बदलत्या राजकीय परिस्थितीला घाबरण्याची गरज नाही. किनवट तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रदीप नाईक यांच्या विजयात महिलांचा टक्का जास्त असेल असा विश्वास रावणगांवकर यांनी व्यक्त केला. दरम्यान सकाळपासूनच एन के गार्डन येथे महिलांची प्रचंड गर्दीने परिसरात यात्रेचे स्वरूप आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिंदाबाद, प्रदीप नाईक तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है क्या घोषणाने परिसर दुमदुमले त्यामुळे यांचे गार्डन परिसर राष्ट्रवादीमय झाला होता हे विशेष! कार्यक्रमाचे सुत्रसचलन कीर्तिका राजू सुरोशे यांनी केले तर उपस्थितांचे आभार जोषणा राहुल नाईक यांनी मानले. सदरील कार्यक्रमाचे नियोजन किनवट तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन पाटील मुंडे, उपसभापती राहुल नाईक, राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बालाजी बामणे यांनी केले होते तर सदरील महिला मेळाव्याच्या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य संगीता प्रवीण म्याकलवार, पंचफुलाबाई शिवराम जाधव, नगरसेविका करुणा अरुण आळणे, शेवंताबाई मधुकर जाधव, शिवकांता गजानन मुंडे, विद्याताई संतोष दासरवार, लावण्या राजेद्र उपलवार,प्रणितातार्ई गजानन सोळुंके, मीराबाई लक्ष्मण देशमुख, शेख. अरफाना, विद्या प्रकाश जाधव, सुनिता संतोष जाधव,निता जयपाल जाधव यांच्यासह हजारोच्या संख्याने महिलांची उपस्थिती होती.

# मनोज जरांगेंना २४ तास सरकारी सुरक्षा, गुप्तवार्ता विभागाच्या आदेशानंतर निर्णय

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सरकारला वेठीस धरणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आता सरकारी सुरक्षा मिळणार आहे. राज्याच्या गृह विभागाकडून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

मनोज जरांगे पाटलांच्या अवती भोवती २४ तास पोलीस असणार आहेत. २ सशस्त्र पोलीस कॉन्स्टेबल त्यांच्यासोबत असतील अशी माहिती देण्यात आली आहे. मनोज जरांगेंना सुरक्षा पुरवावी अशी मागणी मराठा समाजाकडून करण्यात आली होती. राज्य गुप्तवार्ता विभागाच्या आदेशानंतर जरांगे पोलीस सुरक्षा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मराठा आरक्षणाच्या लढ्यात मनोज जरांगे पाटलांचा महत्वाचा वाटा राहिला आहे. त्यांनी आपल्या उपोषण अस्त्राने सरकारला घाम फोडला. अखेर सरकारला जरांगेंच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. मध्यरात्री तब्बल तीन तास चर्चा झाल्यानंतर सरकारने मनोज जरांगेच्या सर्व मागण्यांचे सुधारित अध्यादेश जारी करून त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले होते. दरम्यान मुंबईत पोहोचण्याआधी पनवेल येथे आरक्षणाचा अध्यादेश जरांगेंच्या हाती देण्यात आला. आरक्षणाच्या चळवळीतला हा मोठा विजय मानला जात आहे.

# महार शंभर वर्षांपूर्वी लढले नसते तर?.

महारांची भीती आज ही अनेक समाजाला वाटते,कारण महारचं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मागे एकजुटीने उभे राहिले होते. खरे महार तेव्हा ही ५६ ला भारी होते आज ही एक महार जो बाबासाहेबांचे विचार मानतो, त्यावर शंभर टक्के विश्वास ठेवून लढतो तो महार ५६ ला भारी पडतो.हे महार किती शूर होते,ते एकजुटीने शिस्तबद्ध पद्धतीने काम करणारे होते.त्यांच्यात गावकी व भाऊकीची शिस्त किती जबरदस्त होती. महार शंभर वर्षांपूर्वी लढले नसते तर?.यांचा इतिहास आम्हाला आज ज्ञानकीर्ती तथा सुरेश बाळाराम धोत्रे यांच्या कडून पुराव्यासह वाचायला मिळाली,अनेक धक्कादायक घटनांची माहिती देणारे कागदपत्रे त्यांनी आम्हाला दाखवली. ब्रम्हदेशाचे पूज्य भनते यू.वजीराबुद्धी यांच्या कडून श्रावस्ती सांस्कृतिक केंद्र गोरेगाव येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन सुरेश बाळाराम धोत्रे हे श्रमाणेर झाले होते तेव्हा त्यांना



ज्ञानकीर्ती हे नांव देण्यात आले होते.पाली पाठ संस्थापक धम्म प्रवचनकार वडवलकर गुरुजी यांच्या सानिध्यात राहून वकृत्व कला साध्य केली. दुर्मिळ ग्रंथाचा संग्रह करण्याच्या वृत्तीमुळे त्यांच्या कडे अपरिचित माहिती ग्रंथ आवाहल,पुस्तकाचे भंडार आहे. आजच्या घडीला ती खूप महत्वाची एतीहासिक माहिती आहे. तेव्हाची महार पंचायत आजची बौद्धजन पंचायत समिती १९६९ चे ते बौद्धांचार्य श्रमाणेर आहेत,त्यांच्या लढाऊ व अभ्यासु वृत्तीमुळे ते कोकणात ज्ञानकीर्ती म्हणूनच ओळखले जातात.कामगार नेते साहित्यिक सागर रामभाऊ तायडे यांची चंद्रकांत गमरे,धम्म प्रचारक,अनंत मोहिते,धम्म प्रचारक,यांनी सुरेश बाळाराम धोत्रे तथा ज्ञानकीर्ती यांची मुंबईतील महार समाजाचा पूर्वीचा बालेकिल्ला खार,आजचा प्रसिद्ध राजगृह आंबेडकर रोड,खार मुंबई.येथे येतीहासिक भेट घडवून आणली तेव्हा राजेंद्र जाधव,प्रिंटींग क्षेत्रातील तज्ञ सोबत होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE